वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि.२२ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## आतील पानावर वाचा


* बीड नगर परिषदेचे नगरसेवक व नगराध्यक्ष
* पराभव स्विकारलाय-नदीम
* सेवानिवृत्त शिक्षकांची बैठक







# भाजपचा इतिहासातील सर्वांत मोठा विजय

## निकालानंतर देवेंद्र फडणवीसांची प्रतिक्रिया, आकडेवारीच दिली

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्यातील मिनी विधानसभा म्हणून राज्याचं लक्ष लागलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल आज हाती आले असून भाजपने पुन्हा एकदा मुसंडी मारली आहे. त्यामुळे, सकाळपासूनच भाजपने विजयाचा जल्लोष केल्याचं दिसून आलं. भाजपने (इगझ) जवळपास १२९ जागांवर विजय मिळवला असून शिंदेंच्या शिवसेनेनं ५४ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही ४० जागांवर विजय मिळवला आहे. त्यामुळे, भाजप महायुतीने जवळपास सव्वा दोनशे जागांवर विजय मिळवला आहे. या विजयानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच, हा विजय टीम भाजपचा असून इतिहासातील सर्वात मोठं यश भारतीय जनता पक्षाचं असल्याचंही त्यांनी म्हटलं.

महाराष्ट्रात भाजपाचे १२९ नगराध्यक्ष विजयी झाले असून ३ हजारांपेक्षा जास्त नगरसेवक विजयी झाले आहेत.



भाजपाला २०१७ पेक्षा मोठा विजय मिळाला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात हे मोठं यश मिळालं असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. भाजपने १२९ नगराध्यक्षपदावर विजय मिळवला असून महायुतीच्या तिघांचे मिळून जे नगराध्यक्ष आहेत ते ७५ टक्के आहेत. नगरसेवकपदावर भाजपने नवा रेकॉर्ड केलाय. यापूर्वीच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपचे १६०२ नगरसेवक होते, आता त्याच्या दुपटीचे ३३०२ नगरसेवक आहेत, अशी माहितीही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. गेल्या २० ते २५ वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासात एवढा मोठा विजय कोणालाच मिळालेला नाही, तो भाजप महायुतीला मिळाला. मी एकाही सभेत कुठल्याही पक्षाच्या विरोधात, नेत्याच्या विरोधात बोललो नाही. मी केवळ विकासाच्या बाबतीत बोललो, विकासाची ब्लू प्रिंट आम्ही लोकांसमोर मांडली. ही पहिलीच निवडणूक होती, ज्या निवडणुकीत एखाद्या पक्षाच्या मुख्यमंत्र्यांने कोणावरही टीका न करता एवढं मोठं यश मिळवलं आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. टीम भाजपचा हा विजय आहे, लोकांच्या विश्वासाला आम्ही नक्कीच सार्थ ठरवू, विकासाला चालना देऊ, असेही फडणवीस यांनी म्हटले. ३ हजारांच्या आसपास आमचे नगरसेवक निवडून आले असून सर्व मंत्र्यांनी आणि पदाधिकारी यांनी निवडणुकीत मोठी मेहनत केली. जवळपास १ लाख ६ हजार बूथवर काम करणारे कार्यकर्त्यांनी ताकदीने परिश्रम घेतले. अमित शाह म्हणतात ५१ टक्के लढाई संसद ते पंचायत कार्यकर्त्यांनी डोक्यावर घेऊन लढली पाहिजे. त्यानुसार, कोणत्याही नरेटिव्हला बळी न पडता आम्ही या निवडणुका जिंकल्या आहेत. लोकसभेला त्यांनी खोटा नरेटिव्ह पसरवला परंतु आता ते यशस्वी झाले नाहीत. खोटा नरेटिव्ह त्यांनी या देखील निवडणुकीत पसरवण्याचा प्रयत्न केला, परंतु ते यशस्वी झाले नाहीत, अशी प्रतिक्रिया रविंद्र चव्हाण यांनी दिली. देवेंद्र फडणवीस यांनी रोड मॅप तयार केला आहे. महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने हा मॅप असणार आहे. सरकार मायबाप म्हणून कसे राहिल यासाठी ते प्रयत्नशील आहेत. अचानक आलेला पाऊस, झालेल नुकसान या सर्वांबाबत नियम शिथिल करून मदत करण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली, असेही चव्हाण यांनी म्हटले. राज्यात २८८ ठिकाणी निवडणुका होत्या या निवडणुकीत विरोधक नव्हते. उद्धव ठाकरे म्हणाले होते महाराष्ट्रातील जनतेला द्यायला माझ्याकडे काहीच नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने सुद्धा त्याच प्रकारे कौल दिला. २ आकडी देखील संख्या त्यांना ओलांडता आली नाही, अशी टीकाही रविंद्र चव्हाण यांनी केली.




## संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांच्याकडून कौतुकाची थाप

बीड - संघर्षयोध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांची अंतरवाली सराटी येथे भेट घेवून आ.विजयसिंह पंडित, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रतिनिधी संपादक शेख मुजीब यांनी मनोजदादांचे आभार मानले. या विजयी भेट प्रसंगी मनोजदादांचा सत्कार केल्यानंतर मनोजदादा यांनी शेख मुजीब यांच्या पाठीवर कौतूकाची थाप टाकत सत्कार केला. यावेळी नवनिर्वाचित शेख निजाम, फारूख पटेल, महेश धांडे, अशफाक इनामदार यांच्यासह सीए बी.बी.जाधव, बळीराम गवते, लक्ष्मण नरनाळे, झुंजार धांडे, संदीप आदमाने, प्रा.गोपाळ धांडे, भाऊसाहेब डावकर, सुनिल अनभुले, शामभाऊ पडुळे, संदीप पाटील, विजय चांदणे, अखिलभाई, सय्यद जुल्फेखारअली, रमेश चव्हाण, अँड.सय्यद खाजा, खमरभाई, शेख मेहराज आदी.




## परळी शहरात दोन पराभूत उमेदवारांच्या समर्थकांत दगडफेक ; दोन जण जखमी

परळी, (दिव्य न्युज):- परळी येथे नगरपालिका नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे मतदान, मतमोजणी शांततेत पार पडली. मात्र शहरातील इस्लामपुरा बंगला परिसरात नगरसेवक पदाच्या दोन पराभूत उमेदवारांच्या समर्थकांमध्ये रविवारी रात्री वादावादी होऊन ८.३० वाजता रुपांतर दगडफेकीत झाले. या घटनेत दोघेजण जखमी झाले आहेत.

परळी शहरात सकाळ पासून नगर पालिका निवडणूकीची शांततेत मतमोजणी झाली. त्यांनतर रात्री आठ वाजेपर्यंत आप आपल्या प्रभागात विजयी झालेले नगरसेवक, समर्थक आनंद साजरा करत असतांना इस्मामपुरा भागात मात्र दोन पराभूत नगरसेवकाच्या गटात दगडफेकीची घटना घडली. या घटनेतील जखमींना परळी उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.दरम्यान, एका जखमीस पुढील उपचारासाठी रुग्णवाहिकेतून अंबाजोगाई येथील स्वाराती आले जखमी रुग्णालयात हलविण्यात आहे. झालेल्या प्रकृती सध्या स्थिर दोघांची आहे. पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन, पोलीस उपनिरीक्षक दीपक राठोड, पोलीस जमादार संजय खताळ, आकाश जाधव यांच्यासह बीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

उपजिल्हा रुग्णालयातील अपघात विभागाच्या बाहेर जखमींना भेटण्यासाठी त्यांच्या मित्र व नातेवाईकांची एकच गर्दी दिसून आली. ही गर्दी रात्री साडेदहा वाजेपर्यंत होती. मात्र पोलिसांच्या तत्काळ हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी रात्री साडेदहा वाजेपर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. या प्रकरणी तक्रार आल्यांनतर गुन्हा नोंदवण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

## अखेर जवळगाव खून प्रकरणाचा उलगडा; चार आरोपी गजाआड

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव शिवारात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली होती. बीड स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे अवघ्या दोन दिवसांत या खुनाचा छडा लावून मुख्य आरोपीसह चार जणांना अटक केली आहे. १८ डिसेंबर २०२५ रोजी जवळगाव येथील गायरान शेतात स्वप्निल ऊर्फ चिंगू अशोक ओव्हाळ (३०, रा. चक्रे गल्ली, रेणापूर) याचा मृतदेह पालथ्या स्थितीत आढळून आला होता. शवविच्छेदन अहवालात स्वप्निलचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर बर्दापूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी मुख्य आरोपी गोरोबा मधूकर डावरे (४५, रा. जवळगाव, ता. अंबाजोगाई) याच्यासह त्याचे साथीदार संतोष लिंबाजी मांदळे (३४, रा. इंडियानगर, लातूर), किशोर गोरोबा सोनवणे (२९, रा. बसवेश्वर चौक, लातूर) आणि अमोल विनायक चव्हाण (२६, रा. एस. टी. क्वार्टर, लातूर) यांना २० डिसेंबर रोजी ताब्यात घेतले. मृत स्वप्निल हा मुख्य आरोपी गोरोबा याचा नातेवाईक होता. स्वप्निल हा सतत दारू पिऊन पत्नीला आणि गोरोबा यांना त्रास देत असे, तसेच त्याने वादात गोरोबाच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला होता. याच रागातून गोरोबाने त्याला रेणापूर येथून जवळगावला आणले आणि गळा आवळून त्याची हत्या केली.सदर प्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २९९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वर कांबळे, सुशांत सुतळे, मारुती कांबळे, रामचंद्र केकान, विष्णू सानप, गोविंद भताने, सचिन आंढळे, विकी सुरवसे, अतुल हराळे, शरद कदम आणि कडुबा म्हेत्रे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पूर्ण केली

## वर्ष लोटले ,पैसे भरूनही सोलर पंप मिळेनात

नेकनुर, (दिव्य न्युज):- रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी रात्रीचा 'काळोख' आणि 'कडाक्याची थंडी' सोसण्यापेक्षा शेतकऱ्यांनी सौर ऊर्जेचा आधार घेण्याचा निर्णय घेतला. मात्र, पैसे भरून वर्ष लोटले तरी अनेक कंपन्यांनी अजूनही सोलार पंप बसवून दिलेले नाहीत. परिणामी, यंदाही शेतकऱ्यांना विजेचा लपंडाव आणि वन्यप्राण्यांच्या दहशतीत रात्र जागून काढावी लागत आहे. फसवणूक करणाऱ्या या कंपन्यांवर कडक कारवाई करून त्यांना दंड करण्याची मागणी नेकनूर भागातील शेतकऱ्यांनी केली आहे.

रब्बी हंगामात पिकांना पाणी देणे अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र, महावितरणच्या लहरी कारभारामुळे कधी महिनाभर वीज नसते, तर कधी रात्री-अपरात्री वीज पुरवठा केला जातो. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून शासनाच्या सोलार पंप योजनेसाठी शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात कोटेशन भरले. रात्रीचे जागरण थांबेल आणि दिवसा पिकांना पाणी देता येईल, ही यामागची मुख्य आशा होती.

काही सुदैवी शेतकऱ्यांना सहा महिन्यांत पंप मिळाले, मात्र अनेक शेतकरी अद्यापही प्रतीक्षेत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, काही कंपन्यांनी शेतकऱ्यांना पंप बसवण्यासाठी शेतात खड्डे खोदायला लावले, पण प्रत्यक्षात साहित्य पोहोचवलेच नाही. वारंवार विनंती आणि अर्ज करूनही कंपन्यांकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.सध्या रब्बीचा हंगाम जोमात आहे. अशावेळी शेतात पाणी देणे गरजेचे असताना शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. दिवसा वीज नसल्याने रात्रीची वाट पाहावी लागते. थंडीत रात्री पाणी देणे आरोग्यासाठी घातक ठरत आहे. रात्रीच्या वेळी शेतात पाणी भरताना बिबट्याच्या हल्ल्याची भीती कायम आहे.

गेल्यावर्षी नोव्हेंबरमध्येच बत्तीस हजार पाचशे रुपये सोलर पंप साठी भरले मात्र शक्ती नावाच्या कंपनीने अजूनही सोलर दिलेले नाही. मागच्या महिन्यात संपर्क केला असता खड्डे खोदा पंधरा दिवसात बसवू म्हणून सांगण्यात आले, मात्र अजून बसवला नाही शिवाय आता तर संबंधित कंपनीचा कर्मचारी फोनही उचलत नसल्याने रात्रीचे जागरण आणि थंडी याला तोंड द्यावे लागत आहे. शासनाने अशा कंपन्यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि ताबडतोब सोलर द्यावे.

# बीडचे नुतन नगराध्यक्ष व नगरसेवक

दिव्य वार्ता

**एकूण जागा - ५२**

| | |
|---|---|
| राष्ट्रवादी अजित पवार गट | १९ |
| भाजप | १५ |
| राष्ट्रवादी शरद पवार गट | १२ |
| शिंदेसेना | ३ |
| काँग्रेस | १ |
| एमआयएम, ठाकरे गट | २ |

### नगराध्यक्ष
प्रेमलता पारवे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
प्रेमलेता दा. पारवे- राकाँ अ.प.- ३५८१२
डॉ. ज्योती रविंद्र घोमरे -भाजप- ३२०३३
स्मिता विष्णु वाघमारे - राकाँश.प.-२५५४०

### प्रभाग क्र. १ - अ
अशोक काळे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
अशोक काळे - राकाँ श.प. - १९८०
धनंजय काळे - राकाँ अ.प. - ४९१
राजू जाधव - शिवसेना - ४२८
मीनाक्षी डोमाळे - काँग्रेस - २५

### प्रभाग क्र. १ - ब
बबीता जाधव

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
बबीता जाधव - राकाँ श.प.- १४३०
सविता जाधव - राकाँ अ.प. - ४३६
संगीता अशोक लोढा - भाजप - ५४८

### प्रभाग क्र. २ - अ
सावित्री साखरे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
सावित्री विनोद साखरे- भाजप - २६६७
स्वाती दुधाळ - राकाँ श.प. - १४७४
दीपाली धोत्रे - राकाँ अ.प. - ४४०

### प्रभाग क्र. २ - ब
शुभम धूत

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
शुभम दिलीप धूत - भाजप - २८६५
सत्यजीत गुरखुदे - शिवसेना - १६१
विष्णु वाघमारे - राकाँ श.प. - १२८७
राहुल शिनगारे - राकाँ अ.प. - २८०

### प्रभाग क्र. ३ - अ
रेशमा सरवदे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
रेशमा सरवदे - राष्ट्रवादी काँग्रेस - २६३३
अश्विनी गोरख मोमीन -भाजप - १४८४
राधा आकाश घोरपडे - सेना (उबाठा)-१३८
वर्षा चांगुजी लोंढे - काँग्रेस - ११६

### प्रभाग क्र. ३ - ब
अमर नाईकवाडे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
अमर नाईकवाडे - राकाँ अ.प. - ३२७०
अमृत सारडा - भाजप - १७१६
रवि बागल - राकाँ श.प. - २५
सय्यद फारुक अमीर - काँग्रेस - १२

### प्रभाग क्र. ४ - अ
भारत कांबळे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
भारत कांबळे - राकाँ श.प. - १७१३
प्रेमचंद चांदणे - भाजप - १६४८
श्रीनाथ जोगदंड - अपक्ष - ३८
वैष्णवी टाक - राकाँ अ.प. - ६९९

### प्रभाग क्र. ४ - ब
मीना जाधव

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
मीना जाधव - भाजप - १६३८
मंगलाबाई चांदणे - राकाँ श.प. - १३३९
संजीवनी जोगदंड - अपक्ष - ८२२
सीतल लोहट - काँग्रेस - २१०

### प्रभाग क्र. ५ - अ
सूरज चुंगडे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
सूरज चुंगडे - शिवसेना (शिंदे) - १९६९
प्रकाश कानगावकर - भाजप - १२३४
दीपक चित्रे - अपक्ष - ५८
सम्राटसिंग चौहान - राकाँ श.प. - ९४१

### प्रभाग क्र. ५ - ब
मीना चौहान

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
मीना चौहान - भाजप - २५२५
वैष्णवी पवार - राकाँ श.प.- १४२८
प्रतिभा परळकर - अपक्ष- ६०
वैशाली पांडे - शिवसेना - ५८०

### प्रभाग क्र. ६ - अ
मोमीन सीमा

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
मोमीन सीमा परवीन -राकाँअ.प.-१६७७
पठाण नाजेमा खातून - एमआयएम- १६६३
श्वेता जाधव - भाजप - ११७०
पूजा शहाणे - आम आदमी पा. - ४५

### प्रभाग क्र. ६ - ब
जैतुल्लाखान

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
जैतुल्ला खा. फैजुल्लाखान-राकाँअ.प.-१६३९
खान आयुब रहीमखान - एमआयएम-१०३२
सुबोध थिगळे - भाजप - १०१७
पठाण जलीलखान र. - राकाँश.प. -११६३

### प्रभाग क्र. ७ - अ
भाग्यश्री देशपांडे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
भाग्यश्री देशपांडे- भाजप- १८६४
सविता काळे - शिवसेना - १४५५
सुरेखा साळुंके- राकाँ श.प. - ५५१

### प्रभाग क्र. ७ - ब
जगदीश गुरखुदे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
जगदीश गुरखुदे- भाजप - २०८६
किशोर काळे - राकाँ श.प.- ४८१
बाळासाहेब जाधव - शिवसेना - १२५०
विद्यासागर जव्हेरी - अपक्ष - १६

### प्रभाग क्र. ८ - अ
राहुल गुरखुदे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
राहुल गुरखुदे - भाजप - १२७८
शेख एकबाल अहेमद - राकाँअ.प.- ११५२
शेख अमर जैनोद्दीन - अपक्ष - १३
गजानन कदम - शिवसेना - ३०८

### प्रभाग क्र. ८ - ब
मनीषा गिराम

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
मनीषा उल्हास गिराम - उबाठा - १२२६
प्रतिभा महेश राऊत - राकाअ.प.- ११२७
संध्या राजपूत- भाजप - ११३६
स्नेहा पट्टेकर - अपक्ष - ६८

### प्रभाग क्र. ९ - अ
रेखा पिंगळे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
रेखा पिंगळे - राकाँ श.प. - १६६८
पुष्पा पोकळे - राकाँ अ.प.- १४०६
जयश्री कुटे - भाजप - ७५४
शेख सना समीर - काँग्रेस - ७६

### प्रभाग क्र. ९ - ब
शेख अथर

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
शेख अथर न. - राकाँ श.प.- १६७६
शेख शाहेद मुजफ्फर - राकाँ अ.प. -१४३१
शीतल गायकवाड - भाजप - ९६३

### प्रभाग क्र. १० - अ
मंगेश धोंगडे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
मंगेश धोंगडे - भाजप - १२६६
शिवाजी जाधव - राकाँ श.प. - ९०६
उषा तांदळे - राकाँ अ.प. - ४१०
अमित वाघमोडे - स्वराज्य श.सेना - १४

### प्रभाग क्र. १० - ब
भाग्यश्री तांबारे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
भाग्यश्री तांबारे - भाजप - १३३१
ज्योती रुईकर - राकाँ श.प. - ७३८
रजनी शेळके - राकाँ अ.प. - ४६४
मीनाक्षी कुलकर्णी - अपक्ष - ५७

### प्रभाग क्र. ११ - अ
मोमीन खमरूनीसा

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
मोमीन खमरुनीसा शा.-राकाँश.प.-१५३९
शेख फरहत बेगम न.राकाँअ.प.-१११४

### प्रभाग क्र. ११ - ब
पठाण अफसरखाँ

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
पठाण अफसरखाँ क.- राकाँ श.प.- ११४२
भाणिक वाघमारे - अपक्ष - २३९
शेख मोहम्मद (सा.शे.खा.)-राकाँअ.प.- १०३१
शेख नदीम गणी - अपक्ष - ९७

### प्रभाग क्र. १२ - अ
सीता मोरे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
सीता मोरे - राकाँ अ.प.- १६९७
आदर्श जाधव - राकाँ श.प. - १५७१
चंद्रकांत काळे - बसपा- १८८
साहस आदोडे - भाजप - १२३१

### प्रभाग क्र. १२ - ब
पूजा गुजर

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
पूजा गुजर - भाजप - १६८२
सारिका जवकर - राकाँ अ.प.- १०६९
सानिया पठाण - एमआयएम- २२३
शेख जैनाबबी वसीम - राकाँश.प.-१३८१

### प्रभाग क्र. १३ - अ
समीक्षा शेटे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
समीक्षा प्रशांत शेटे - भाजप - ११३७
नीना वाघचौरे - राकाँ अ.प. - १०५६
मायादेवी ज्ञा. पारवे- राकाँ श.प.- ८८२

### प्रभाग क्र. १३ - ब
सय्यद मुस्तफा

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
सय्यद मुस्तफा मै. - भाजप - ११९९
जयश्री वि. विधाते - राकाँअ.प.-९९१
वैभव उत्रेश्वर चिरके -राकाँश.प.-९२८

### प्रभाग क्र. १४ - अ
प्रमोद शिंदे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
प्रमोद गोरख शिंदे - राकाँअ.प.- १४०१
गणेश लक्ष्मण वाघमारे - भाजप - ११९९
धम्मप्रिया रवि वाघमारे - उबाठा-४५२
नवनाथ सरवदे- वं.ब.आघाडी- २४४

### प्रभाग क्र. १४ - ब
आरती बनसोडे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
आरती र. बनसोडे - राकाँअ.प.-१५७५
कल्याणी अ. राजपुरे- राकाँश.प.-८११
मनीषा सु. सुरवसे - भाजप- ७६८

### प्रभाग क्र. १५ - अ
सारिका क्षीरसागर

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
सारिका क्षीरसागर - भाजप- १५५४
मनीषा महादेव आगे - राकाँश.प.-७५७
सुनीता प्रकाश काळे- राकाँअ.प.- ३६६
स्वाती बाजीराव पवार- काँग्रेस- ३५

### प्रभाग क्र. १५ - ब
आदित्य माने

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
आदित्य संतोष माने - भाजप - १२३८
पंकज बाहेगव्हाणकर - राकाँश.प.- ७४८
अजिंक्य राजेंद्र पांडव-राकाँअ.प.- ५११
संदीप शेषेराव उबाळे - अपक्ष - १८२

### प्रभाग क्र. १६ - अ
नुजतआरा शेख

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
नुजत आरा श. शेख - राकाँअ.प.-१९९४
कुरेशी सबा नाझ - राकाँश.प.-१४३३
म. जमिलाबी सलोमोद्दीन-काँग्रेस-४७६
प्रणिता नरेंद्र करमाळकर- भाजप- ४४३

### प्रभाग क्र. १६ - ब
फारुकअली पटेल

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
फारुकअली पटेल - राकाँअ.प.-२५५५
श.नसीम रफियोद्दीन -राकाँ श.प. - १२२१
गणेश कचरु चव्हाण - भाजप - ४४६
सलमान चौधरी - एमआयएम- ९८

### प्रभाग क्र. १७ - अ
महेश धांडे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
महेश अर्जुन धांडे - राकाँ अ.प.- १८०५
मो.अ.अहेमद अ.खदीर-एमआयएम-१४४६
शेख शाकेर फकीर म. - राकाँश.प. -१२३६
विशाल दीपक राऊत- भाजप- ४१७

### प्रभाग क्र. १७ - ब
शेख शबनम

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
शेख शबनम बिलाल- राकाँअ.प.-१८७१
अमृता मुकुंद भोसले- राकाँश.प.-१७५९
श.रुखसाना बेगम श.-शेकाप- ४२१
शीतल जोगदंड - शिवसेना - १६७

### प्रभाग क्र. १८ - अ
शेख फरहीन

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
शेख फरहीन आरशान- राकाँ-श.प.-१८३७
शेख सबा कि.मणियार- एमआयएम-१११७
सय्यद मुस्कान फा.-राकाँअ.प.- १६२२
पूजा कैलास रणखांब-भाजप- ४०७

### प्रभाग क्र. १८ - ब
अशफाक इनामदार

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
अशफाक इ.इनामदार-राकाँअ.प.-२६१३
श.अ.मुकीत अ.रज्जाक-राकाँश.प.-१८१७
नवनाथ कातखडे - भाजप- ४०६
शेख मुश्रीफ श.सलीम-काँग्रेस- ७०

### प्रभाग क्र. १९ - अ
स. सादेकअली

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
सय्यद सादेकअली - राकाँअ.प.-१६८५
शेख शोऐब हफिजोद्दीन -राकाँश.प.-१०९६
परसराम पांडुरंग जाधव - भाजप- १०८४
कुरेशी परवेज - काँग्रेस - ११६

### प्रभाग क्र. १९ - ब
मीना गोडसे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
मीना गोडसे - राकाँअ.प.- १०९१
रुपाली स. पवार- अपक्ष- ७९२
मीराबाई जाधव- शिवसेना उबाठा- ६३६
मुक्ता सातपुते - भाजप - ४९२

### प्रभाग क्र. २० - अ
श.शहानूरबी

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
श.शहानूरबी खाजामियाँ-राकाँश.प.-१४३३
सफुरा अबू सु.सय्यद - एमआयएम-१०२०
सय्यद म.मौलाभाई - राकाँअ.प. - ६१९
नेहराज सलीम जहांगीर-अपक्ष-५४८

### प्रभाग क्र. २० - ब
स.इलियास

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
स.इलियास हमीद - एमआयएम-१४२६
श.सर्फराज श.अ.सलाम-राकाँश.प.-१०६०
पुरुषोत्तम ना. वीर- राकाँअ.प.- ६१६
स.मुजीबोद्दीन मो. शहा- अपक्ष- ८२४

### प्रभाग क्र. २१ - अ
पायल जाधव

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
पायल दत्ता जाधव - राकाँअ.प.- १६८१
पौर्णिमा सचिन चव्हाण-राकाँश.प.-१३४१
नेहा रोहन गायकवाड-भाजप-४२७
मीराबाई संतराम गुंजाळ-अपक्ष- ९७

### प्रभाग क्र. २१ - ब
बाळासाहेब गुंजाळ

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
बाळासाहेब ल. गुंजाळ -राकाँअ.प.-१६८७
ज्ञानेश्वर गायकवाड-राकाँश.प.- १६४८
भागचंद मारुती सानप- भाजप- १९६

### प्रभाग क्र. २२ - अ
शेख शबाना

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
शेख शबाना खय्युम - राकाँअ.प.-१६५८
शे. सुमैय्या शे.वसीम - राकाँश.प.- ११००
शेख सज्जू अजहर-एमआयएम-९६५
रोहिणी प्रदीप साळुंके-भाजप- ३२

### प्रभाग क्र. २२ - ब
शेख निजाम

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
शेख निजाम जैनोद्दीन-राकाँअ.प.-१४५५
शे.शमशीर फिरोज- राकाँश.प.-१२२२
शेख सोहील अकबर-एमआयएम-९४९
सुनंदाबाई दिनकर जाधव - भाजप- ६२

### प्रभाग क्र. २३ - अ
खुर्शीदमिया मो.

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
खुर्शीदमिया मोमीन- राकाँश.प.- १७४०
मोमीन अजहरोद्दीन - एमआयएम-१२९८
हुसेन आ. कादर- काँग्रेस - १०१७
मोमीन जुबेर अहेमद-राकाँअ.प.-८२१

### प्रभाग क्र. २३ - ब
हिना कुरेशी

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
हिना वाजेद कुरेशी- काँग्रेस- १७३०
पठाण नेहा खानम - एमआयएम-१५०८
शेख बानूबेगम-राकाँश.प.- १३९२
शे. बिस्मिल्ला पाशामिया-राकाँअ.प.-९२९

### प्रभाग क्र. २४ - अ
जोया अनम मो.

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
जोया अनम मो. मे.-राकाँश.प.-१०९९
शेख शिरीन सुलताना-राकाँअ.प.-६४९
मोमीन उजमा अन्सार-एमआयएम-६२६
भाग्यश्री बोबडे - शिवसेना- ६२६

### प्रभाग क्र. २४ - ब
शेख अफसर

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
शेख अफसर शे.म.- राकाँश.प.-१०२३
केशरबाई गलधर-राकाँअ.प.- ५६४
शेख मुजाहेद मुजीब-एमआयएम-७७०
ज्ञानेश्वर राऊत- भाजप- ४९१

### प्रभाग क्र. २५ - अ
ज्योती पिंगळे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
ज्योती नं.पिंगळे- भाजप- १६२२
स्वाती अ. नाईकवाडे - राकाँअ.प.-१४०९
विद्या गोरख गायकवाड-राकाँश.प.-५०१
स्वाती उत्रेश्वर नन्नवरे-काँग्रेस-३३

### प्रभाग क्र. २५ - ब
विनोद मुळूक

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
विनोद मुळूक - राकाँअ.प.- १७८३
अजिंक्य बा. शिराळे-भाजप- १४३३
विजय ब.लव्हाळे- राकाँश.प.-३२५
सतीश थ. गायकवाड-काँग्रेस- ३२

### प्रभाग क्र. २६ - अ
शीतल चक्रे

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
शीतल विश्वनाथ चक्रे-शिवसेना-१२२६
विद्या सुशील कांबळे-राकाँअ.प.-१११९
शिल्पा प्रदीप जाधव-राकाँश.प.- ५९३
सुरेखा श्रृंगारे-एमआयएम-४८८

### प्रभाग क्र. २६ - ब
संजय उडाण

उमेदवार (पक्ष - मिळालेली मते)
संजय जर्नादन उडाण -शिवसेना-१५३७
शे.इलियास युनूस- राकाँअ.प.-९१४
शे. फराद सत्तार- राकाँश.प.-५६२
पठाण बिलालखान-एमआयएम-४८२




नेकनूर : आज दिनांक २२/१२/२०२५ सोमवार रोजी जिपप्राशा ऊर्दु कन्या नेकनुर येथे गुणवत्ता व आश्वासन आराखडा पुनर्मुल्यांकनात सदर शाळा ४ स्टार रेटींग प्राप्त झाल्यामुळ नेकनूर ग्रामपंचायत सदस्य व प्रतिष्ठीत नागरीकांच्या वतीने मुख्याध्यापिका श्रीमती.निसफत बेगम व सर्व स्टाफचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य शेख अर्शद उर्फ राजा भैय्या,ग्रामपंचायत सदस्य सय्यद रहीम साहब,ग्रामपंचायत सदस्य सय्यद रिजवान. व,शा.व्य.सदस्य खाजापाशा,पालक शेख साबेर,कमेटी सदस्य बाबर खतीब व केंद्र क म नेकनुरचे केंद्र प्रमुख ईद्रीस जाफर सर व या शाळचा सर्व स्टाफ उपस्थित होता.

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला हायकोर्टाचा मोठा झटका

बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी राज्यभर खळबळ उडाली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मोठा झटका दिला आहे. कराड यांनी दाखल केलेला जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला असून, ते सध्या बीड कारागृहातच राहतील.



या प्रकरणात वाल्मिक कराड हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. कराड यांचे नाव समोर आल्यानंतर मुंडे यांच्यावरही गंभीर आरोप झाले होते, त्यानंतर त्यांनी आरोग्याच्या कारणास्तव मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता.न्यायालयाने निकाल देताना नमूद केले की, प्राथमिक पुराव्यांवरून वाल्मिक कराड यांचा खंडणी प्रकरणात सहभाग, त्यानंतर सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण आणि हत्या या गुन्ह्यात भूमिका स्पष्ट दिसते. कॉल डेटा रेकॉर्ड (उऊ), मोबाईल संभाषणे, कराड आणि इतर आरोपींमधील सततचा संपर्क, जप्त व्हिडीओ क्लिप्स, आवाजाच्या नमुन्यांची तपासणी आणि फॉरेन्सिक अहवाल या सर्व बाबींचा सविस्तर विचार करण्यात आला. या ठोस पुराव्यांमुळे जामीन देणे योग्य ठरणार नाही, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला.दरम्यान, अलीकडेच नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीनंतर धनंजय मुंडे यांनी जनतेच्या न्यायालयात मी विजयी झालो असे विधान केले होते आणि प्रचारात कराड यांचा उल्लेखही केला होता. मात्र, हायकोर्टाच्या या निर्णयामुळे हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून, पुढील घडामोडींकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## जिंतूरमध्ये मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट:तीन चिमुकल्या बालकंवर जिव घेना हल्ला चढवला

जिंतुर / दिव्य न्युज :
सालेह चाऊस

जिंतूर: येथील हिदायत नगर परिसरात दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५:३० वा दरम्यान तीन लहान मुले त्याचा घरा समोर खेळत असताना अचानक मोकाट कुत्र्यांनी त्या तीन ही बालकांनावर हल्ला करून गंभीर जख्मी केल्याची घटना घडली आहे. या बाबत सविस्तर माहिती अशी की,हितायतनगर वसाहत मधील शे रिजवान शे हुसेन( वय ६ वर्ष ), सय्यद तैमूर सय्यद फेरोज( वय ५ वर्ष), व जुनेरा तोफीक कुरेशी( वय१ वर्ष) हे तीन चिमुकले बाळ त्याचा घरासमोर खेळत होते. त्या वेळी या परिसरातील मोकाट भटक्या कुत्र्यांनी अचानक या बालकांवर हल्ला चढविला या हल्यात शे रिजान याचा डोक्याला चावा घेतल्याने तो गंभीर जखमी झाला असुन इतर दोन लहान बालंकाना सुद्धा दुखापत झाली आहे.या बालकांचा आक्रोश ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊनमोठ्या प्रयत्नाने या बालकांची कुत्र्यांच्या तावडीतून सुटका केली.जखमी तिन्ही बालकांना जिंतूरच्या ग्रामीण रुग्णालयात प्रथम उपचार करून त्यांना परभणीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेनंतर हिदायत नगर सह सर्व शहरामध्ये भितेचे वातावरण निर्माण झाले आहे या मोकाट भटक्या कुत्र्यांच्या हल्यामुळे लहान बालकांच्या सुरक्षतेबद्दल पुन्हा एकदा प्रश्न निर्माण झाला आहे जिंतूर शहरातील नागरिकांची नगरपरिषदेस अशी मागणी आहे की या मोकाट कुत्र्यांचा ताबडतोब बंदोबस्त करण्यात यावा व मोकाट कुत्र्यांचा निर्बिजीकरन, नसबंदी करून त्यांची संख्या कमी करावी.



# पराभव स्विकारलाय,पण जिद्द अजूनही कायम आहे!



अल्लाहला जे योग्य वाटते, तेच घडते... त्याच्या निर्णयापुढे मी नतमस्तक आहे. अस सलाम अलैकुम आदाब, नमस्कार नुकत्याच झालेल्या निवडणुकीत माझा केवळ २२३ मतांनी निसटता पराभव झाला. हा निकाल मी नम्रपणे स्वीकारतो. एक सामान्य घरातील व्यक्ती असूनही, संघर्षातून अल्लाहनी मला आज इथपर्यंत आणले, हेच माझ्यासाठी खूप मोठे आहे. ज्या ठिकाणी पोहोचण्याची कधी अपेक्षाही केली नव्हती, तिथे आज समाजाने आणि अल्लाहनी मला स्थान दिले आहे.

माझ्यासाठी हा पराभव नाही, तर यशाची एक पायरी आहे:

* **जनतेचे प्रेम:** जरी मी तांत्रिकदृष्ट्या हरलो असलो, तरी ज्या हजारो मतदारांनी माझ्यावर विश्वास दाखवला, त्यांच्या मनात मी स्थान मिळवले आहे. त्यामुळे मी स्वतःला विजयीच समजतो.
* **अल्लाह शक्तीवर विश्वास:** माझा अल्लाहवर अढळ विश्वास आहे. कदाचित माझ्या हातून आणखी मोठी समाजसेवा घडावी, म्हणूनच हा निकाल असावा.
* **संघर्ष आणि ओळख:** राजकारण हा जीवनाचा एक भाग आहे, पण अल्लाहनी मला एक यशस्वी उद्योगपती आणि समाजसेवक म्हणून जी ओळख दिली आहे, ती मी अधिक सक्षमपणे पुढे नेईल. तुमच्या शुभेच्छा आणि सर्व मतदारांचा आशीर्वाद माझ्यासोबत नेहमीच आहे. माझी ही वाटचाल इथेच थांबणार नाही, तर समाजहितासाठी माझे प्रयत्न आणि जिद्द पुन्हा नव्याने जोमाने सुरू राहतील.

माझ्याकडून अल्लाहची, धर्माची किंवा माणुसकीची कोणतीही सेवा घडण्यासारखी असल्यास नक्की सांगा. मी सदैव आपल्या सेवेसाठी तत्पर असेन. मला पक्षानी आणि वरीष्ठांनी माझ्यावर विश्वास करून मला उमेदवारी दिली या निवडणूकीत मला प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष सहकार्य करणारे माझ्या सोबत रात्र दिवस काम करणारे माझे कार्यकर्ते, हितचिंतक, शुभचिंतक, यांचे

**मी आभारी आहे.**

माझ्या सोबत राहून मला हरवण्यासाठी अप्रत्यक्ष प्रयत्न करणाऱ्यांचा ही

**अल्लाह भला करो.**

तुमच्या प्रेमासाठी आणि विश्वासासाठी मी कायम ऋणी आहे!

**सय्यद नदीम सय्यद कलीमोद्दीन**
**प्रभाग क्र.१८ राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार**

# सेवानिवृत्त शिक्षकांच्या आर्थिक लाभासाठी बीड येथे बैठकीचे आयोजन-अनिल जाधवर

बीड । दिव्य न्युज

सेवानिवृत्त शिक्षक तसेच सर्व शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होताच अंश राशी करण व उपदान हे हक्काचे आर्थिक लाभ मिळणे कायद्यानुसार बंधनकारक आहे . शासनाच्या उदासीन धोरणामुळे तसेच अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षितपणामुळे बीड जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे अंश राशीकरण व उपदान हे आर्थिक लाभ एप्रिल २०२४ पासून प्रलंबित आहेत . पाल्यांची लग्न, उच्च शिक्षण तसेच सेवानिवृत्तांचे गंभीर आजार यासाठी हे पैसे कमी येतात परंतु सदरील आर्थिक लाभ न मिळाल्यामुळे सेवानिवृत्त शिक्षक अतिशय आर्थिक अडचणीत आहेत . अंश राशीकर व उपदान रकमा मिळाव्यात म्हणून कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ शासन स्तरावर सतत प्रयत्नशील आहे, याचाच एक भाग म्हणून सोमवारी कास्ट्राईब जनरल महासंघ व समन्वय समितीचे शिष्टमंडळ राज्य अध्यक्ष अनिल जाधवर व उपाध्यक्ष शेख मुसा तसेच समन्वय समितीचे राज्यस्तरीय पदाधिकारी प्राथमिक शिक्षण समिती राजेंद्र खेडकर यांच्यासह शिष्टमंडळाने शिक्षण आयुक्त व शिक्षण ►► पान २ वर













हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफिससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०